# संत तुकारामांच्या अभंगगाथेतुन प्रतीत होणारे त्यांचे व्यक्तिमत्व

## लघुशोधप्रकल्प डॉ. जनार्दन काटकर (File No-23-141/05)

### प्रस्तुत शोधप्रकल्पातील निष्कर्ष

१. संत तुकारामांच्या बाह्यरूपाविषयी ठोस लिखित पुरावा उपलब्ध नसला तरी त्यांच्या चरित्रकारांनी व शिष्यांनी केलेल्या वर्णनावरून त्यांचे बाह्यरूपही त्यांच्या संपन्न अंतर्गत व्यक्तिमत्त्वाप्रमाणे सुस्वरूप देखणे व आरोग्यसंपन्न असावे.

२. संत तुकारामांचा जन्म सुसंस्कृत अशा घरात झाला असल्याने त्यांच्या बालपणी उत्तम संस्कार घडून त्यांचे व्यक्तिमत्त्व सुसंस्कारित झालेले होते.

३. संत तुकारामांच्या अभंगावरून त्यांना संभाषणकला चांगली अवगत होती असे वाटते त्यांच्या संभाषणात गोडवा असून प्रसंगी ते कठोरही बोलत असावेत. उत्तम संभाषण कला त्यांना अवगत असावी.

४. तुकारामांचे वक्तृत्व अत्यंत प्रभावी असावे असे त्यांच्या एकंदर अभंगावरून वाटते. प्रभावी अशा वक्तृत्वाची दैवी देणगी त्यांना लाभलेली होती.

५. तुकारामांचे वाचन प्रचंड होते.

६. त्यांना लेखनकलाही चांगली अवगत असून उत्तम लेखन त्यांनी केले आहे. त्यांना लिखाणाचाही छंद होता.

७. तुकारामांच्या अभंगातून प्रगाढ चिंतनशीलतेचा प्रत्यय येतो त्यांचा स्वभाव चिंतनशील होता.

८. संत तुकारामांची ज्ञानलालसा प्रचंड होती.

९. प्रज्ञा बहुप्रसू होती. तसेच त्यांची स्मृती तीक्ष्ण होती व एका महाकवीची प्रतिभा त्यांना लाभली होती.

१०.संत तुकाराम हे जात्याच श्रद्धाळू असून आई, वडील, संत आणि विठ्ठल यांच्यावर त्यांची श्रद्धा होती.

११.संत तुकारामामध्ये प्रखर निष्ठा होती व उच्च ध्येयाने त्यांचे जीवन सफल झाले होते.

१२.संत तुकाराम प्रखर महत्त्वाकांक्षी होते.

१३.संत तुकारामांच्या ठिकाणी प्रचंड आत्मविश्वास होता.

१४.संत तुकाराम हे निराशावादी नसून आशावादी होते.

१५.संत तुकाराम हे दैववादी नसून प्रयत्नवादी होते.

१६.संत तुकारामांमध्ये परमेश्वरप्राप्तीचे आकर्षण होते.

१७.संत तुकारामांचे संपूर्ण जीवन व कार्य निस्वार्थी होते.

१८.संत तुकाराम जीवनात विशिष्ट भूमिका मनात ठेवून जगले. सर्व समाजात समता प्रस्थापित करणे व एका सुसंस्कृत समाजाची निर्मिती हीच त्यांच्या जीवनातील भूमिका होती.

१९.संत तुकारामांचा धर्म मानवतावादी होता.

२०.संत तुकारामांच्या अंगी नम्रता होती.

२१.विविध खेळ खेळणे, वाचन, मनन, चिंतन, नामस्मरण, कीर्तन भजन हे तुकोबांचे आवडीचे विषय असून दुर्जनांची संगत त्यांना आवडत नव्हती.
२२.संत तुकाराम हे कुटुंबवत्सल गृहस्थ होते.
२३.संत तुकाराम हे अनेकांचे मित्र, सखा होते. संतसंगती त्यांना विशेष आवडत होती.
२४.संत तुकारामाचा स्वभाव सततद्योगी होता.
२५.संत तुकारामामध्ये प्रचंड धाडस व शौर्य होते.
२६.संत तुकारामांचे जीवन रागद्वेषाच्या पलीकडे गेलेले होते.
२७.संत तुकाराम हे सामान्य सांसारिक गृहस्थ होते त्यांनी आपला संसार उत्तम प्रकारे केला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक संसारी माणूस दिसून येतो.
२८.संत तुकारांमाध्ये एक आचारशील भक्त होता. साध्या संसारी माणसापासून साक्षात्कारी संतापर्यंत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास झालेला दिसून येतो.
२९.संत तुकारांमध्ये एक तत्त्वचिंतक दिसून येतो.
३०.संत तुकाराम हे थोर समाजसुधारकही होते.
३१.संत तुकाराम धर्मसुधारकही होते.
३२.अन्यायाविरूद्ध पेटून उठण्याचा संत तुकारामांचा स्वभाव असल्याने त्यांच्यामध्ये एक विद्रोहीमनही दिसून येते.
३३.संत तुकाराम हे प्रभावी प्रबोधनकार होते.
३४.संत तुकाराम हे थोर उपदेशक होते.
३५.संत तुकाराम हे महाकवी होते.
३६.संत तुकाराम हे थोर संत होते.
३७.संत तुकाराम हे थोर सुभाषितकार होते.
३८.तुकारामांच्या आत्मप्रकटीकरणातून त्यांचा प्रांजलपणा, प्रामाणिकपणा दिसून येतो. ते प्रामाणिक होते.
३९.तुकारामांवर घेतले गेलेले सर्व आक्षेप बिनबुडाचे असून ते सत्यावर आधारीत नाहीत. ते संकुचित जातीय द्वेषातून घेतलेले असून ते निराधार आहेत.
४०.संत तुकाराम व्यवहारशून्य, बावळट, एकलकोंडे, आत्मकेंद्री वृत्तीचे, अहंकारी, गर्विष्ठ, शिवराळ, भांडकुदळ नसून ज्ञानी, हुशार, कुशल, समाजप्रिय, बहुकेंद्री, अत्यंत नम्र, निरंहकारी मृदृभाषी, प्रेमळ होते.
४१.तुकाराम अल्पज्ञानी किंवा सामान्य बुद्धीचे नसून ते ज्ञानमहर्षी, प्रचंड बुद्धीमान होते.
४२.छत्रपती शिवाजीराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात त्यांचे मोलाचे योगदान असून ते राष्ट्रप्रेमीही होते.
४३.दि. पु. चित्रे संत तुकारामांच्या व्यक्तिमत्त्वाचे, कवी असणे, माणूस असणे, भक्त असणे, तडफडत असणे, ज्ञानी असणे, दिक्कालात असणे, संपूर्णपणे असणे, असण्याला निरोप देत असणे हे दहा पैलू सांगतात.
४४.डॉ. मुकुंद दातार तुकारामांना, संतश्रेष्ठ, समाजसुधारक कविश्रेष्ठ आणि जगदगुरू म्हणतात.

४५.डॉ. सदानंद मोरे तुकोबांची कविता हे त्यांचे जगणे आहे आणि त्यामुळे त्यांचे जगणे हेच एक महाकाव्य होऊ शकले असे म्हणतात.

४६.वा. ल. कुलकर्णी 'तुकारामांचे व्यक्तिमत्त्व विविधरंगी व विविधढंगी आहे' असे म्हणतात.

४७.भालचंद्र नेमाडे 'तुकारामांचे व्यक्तिमत्त्व, विनयशील, सरळ, शांतताप्रिय, कनवाळू, ज्ञानी, सुविद्य होते. तुकारामांचा स्वभाव, क्षमाशील, चिंतनशील संवेदनाशील आणि मनमोकळा होता' असे म्हणतात.

४८.डॉ आ. ह. साळुंखे 'तुकाराम एक महान लढवय्या होता' असे म्हणतात.

४९.डॉ. अ ना. देशपांडे 'तुकोबा एक असामान्य विभूती, राष्ट्रीय नव्हे तर विश्वविभूती होते' असे म्हणतात.

५०.डॉ. म. सु. पाटील 'तुकाराम हे एकमेव संत आपल्या बद्धावस्थेबद्दल अतिशय तीव्रतेने बोलतात' असे म्हणतात.

५१.डॉ. रा. ग. जाधव 'तुकारामांचे व्यक्तिमत्त्व एकसंघ होते. त्यांच्या जीवनाला व काव्याला निश्चित हेतू होता. तुकारामांचा अभ्यास आणि व्यासंग प्रचंड होता त्यांचे सामाजिक निरिक्षण व्यापक व भेदक होते. ते संस्कारसंपन्न होते. तसेच कठोर आत्मपरीक्षक होते' असे म्हणतात.